# नवी मुंबई महानगरपालिका

**महानगरपालिका सचिव कार्यालय,नवीन मुख्यालय, ३ रा मजला, बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**-: सर्वसाधारण सभेची नोटीस :-** **दिनांक ३०/०७/२०१४.**

नवी मुंबई महानगरपालिकेची ऑगस्ट महिन्याची सर्वसाधारण सभा, शुक्रवार, दिनांक ०८ ऑगस्ट २०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता बेलापूर, भुखंड क्रमांक ०१, सेक्टर १५ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील ५ व्या मजल्यावरील राजमाता जिजाऊ सभागृह येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

१. इतिवृत्त कायम करणे.

२. प्रश्नोत्तरे.

**आयुक्तांकडील प्रस्ताव :**

३. ठाणे-बेलापूर रस्त्याला समांतर रबाळे (चॅनेज क्र. ६.४५५ ) ते पावणे उड्डाणपुलापर्यंत (चॅनेज क्र. ११.७५८) सर्व्हिस रस्ता बांधणे.

४. सी.बी.डी बेलापूर सेक्टर १ए, भुखंड क्र. ०७ए, येथे दैनंदिन बाजार विकसित करणे.

५. ठाणे बेलापुर रस्त्याला समांतर रबाले ते पावणे उड्डाणपुलापर्यंत सर्व्हिस रस्त्यावर दिवाबत्तीची सोय करणे.

६. तुर्भे प्र.क्र. ५८, सेक्टर २२ मधील उर्वरित पदपथांची सुधारणा करणे.

७. नेरुळ सेक्टर १२ येथील झुलेलाल मंदीर ते सारसोळे डेपोपर्यंत गटाराची व पदपथाची सुधारणा करणे.

८. नेरुळ से. ५० भूखंड क्र.५४ब येथील नवीन शालेय इमारतीचे अंतर्गत विद्युतीकरण व इतर विद्युत कामे करणे.

९. नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयाशेजारी आम्रमार्गालगतच्या प्रस्तावित समांतर रस्त्यामध्ये येत असलेली ८०० मि.मी. व्यासाची जुनी मुख्य जलवाहिनी बदलणे व स्थलांतरीत करणे.

१०. कोपरखैरणे प्र.क्र.३१ से.८ येथील मोनालिसा प्लाझा ते रुम नं. ९७० व प्लॉट नं.४३ ते प्लॉट नं. ३२ पर्यंतच्या पावसाळी गटाराची सुधारणा करणे.

११. तुर्भे प्र.क्र.६१ इंदिरानगर येथील नाल्यालगत संरक्षक भिंत बांधणे.

१२. कोपरखैरणे से. २ए येथील फायर स्टेशन ते प्लॉट नं. ८/६५ पर्यंतच्या गटार व फुटपाथची सुधारणा करणे.

१३. किल्ले गावठाण तलावाजवळ फुटपाथ बांधणे व एम.एस. रेलिंग बसविणे. (सुशोभिकरण करणे)

१४. नवी मुंबई महानगरपालिका नवीन मुख्यालय येथे केंद्रीय वातानुकुलित यंत्रणे करीता अतिरिक्त ४०० टन क्षमतेची चिलर यंत्रणा बसविणे.

**ठरावाच्या सूचना :**

**१५ ते १७. श्री. सुरेश गोपाळ शेट्टी, यांजकडून :-**

(१५) प्र.क्र. ७१, सेक्टर - २९ प्लॉट क्र. १० येथील पार्किंग प्लॉटचे कॉंक्रिटीकरण, लाईट व्यवस्था, कंपाऊंड वॉल व गेट बसवण्याची अंमलबजावणी करणे. (१६) प्र.क्र. ७१, सेक्टर ११ प्लॉट क्र. २ येथील टॅक्सी स्टॅण्ड अंतर्गत गटाराची सुधारणा करणे, प्लॉटचे कॉंक्रिटीकरण, लाईट व्यवस्था, कंपाऊंड वॉल व गेट बसवण्याची अंमलबजावणी करणे. (१७) प्र.क्र. ७१, सेक्टर - ३ प्लॉट क्र. १८ बी येथील पार्किंग प्लॉटचे कॉंक्रिटीकरण, लाईट व्यवस्था, कंपाऊंड वॉल व गेट बसवण्याची अंमलबजावणी करणे.

**१८ ते २०. श्री. काशिनाथ जनार्दन पाटील, यांजकडून :-**

(१८) नवी मुंबई महानगरपालिकेच्या नगर नियोजनात नियमामध्ये राहून काचेच्या उंच इमारतीना परवानगी देण्यात येऊ नये. (१९) जुईनगर महानगरपालिका शाळा क्र. १७ च्या इमारतीवर वाढीव बांधकाम करणे. (२०) जुईनगर महानगरपालिका शाळा क्र. १७ चे मैदान विकसित करणे.

**२१ ते २३. श्री. बहादुर त्रिलोक सिंह बिस्ट, यांजकडून :-**

(२१) प्र.क्र. ५, इलठणपाडा, श्रीराम चाळ शेजारी रिक्त अंदाजे ६ ते ७ एकर जागेवर प्रभागातील मुलाकरिता मैदान विकसित करुन मिळावे. (२२) प्र.क्र. ५, इलठणपाडा, एम.आय.डी.सी. रोड ते स्मशानभुमी (इलठण) कच्चा रस्त्यावर (शेजारी) जमिन मालकाकडुन जमीन विकत घेऊन ४ सार्वजनिक (G+१) शौचालय नागरिकांच्या सुविधा करिता १) साईसेवा चाळ, इलठणपाडा २) आदिवासीपाडा, इलठण ३) सुभाषनगर, न्यु रेशनिंग दुकानासमोर ४) मटन शॉपशेजारी, सुभाषनगर येथे बनविणे. (२३) प्र.क्र. ५, इलठणपाडा, कदमचाळ ते रेल्वे धरणापर्यंत पावसाळी पाणी वाहुन नेणारा मोठा नाल्यावर दोन्ही बाजुस संरक्षण भिंत बांधुन मिळावे.

**२४ ते २६. सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-**

(२४) प्र.क्र. ८१ मधील आग्रोळी गावासमोरील नव्याने निर्माण झालेल्या सेक्टर ३० व ३१ या नोडमधील नागरिकांचे वास्तव्य वाढत आहे. सदर नागरिक आपल्या मनपाचे करदाते असल्याने त्यांना सुयोग्य रस्ते, पाणीपुरवठा, मल:निस्सारण वाहिन्या व रस्त्यालगतच्या दिवाबत्ती खांब यासारख्या मुलभुत नागरी सुविधा त्वरीत पुरविणे. (२५) नवी मुंबईतील खेळाडुंना सरावासाठी व विविध खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रत्येक विभाग कार्यालया अंतर्गत जास्तीत जास्त अत्याधुनिक सुविधांनी सज्ज अशी क्रिडा संकुले उभारणे. (२६) नवी मुंबईत महानगरपालिका क्षेत्रातील स्थानिक प्रकल्पग्रस्तांना विष्णुदास भावे नाटयगृहामध्ये तारखामध्ये आरक्षण मिळावे त्याचप्रमाणे नियोजित दरामध्ये ४० टक्के सवलत मिळावी.

**२७ ते २९. सौ. स्वाती अशोक गुरखे, यांजकडून :-**

(२७) नवी मुंबई विभागातील प्रत्येक नोडच्या सुरुवातीस सदर नोडचा झोनल प्लान लावणे. (२८) नवी मुंबईतील प्रत्येक दुभाजकांचे सुशोभिकरण बदलल्याने व वेळोवेळी दुरुस्ती न केल्याने बेकार दृष्य निर्माण होत आहे. तरी सर्व दुभाजकांचे सुशोभिकरण समान पॅटर्नमध्ये करणे. (२९) प्र.क्र. ८२, सेक्टर १ए विभागातील अग्निशमन दल वसाहतीची तुटलेली व मोडकळीस आलेली संरक्षणभिंत दुरुस्त करणे.

**३० ते ३२. सौ. सुरेखा रविंद्र इथापे, यांजकडून :-**

(३०) प्र. क्र. ८०, सेक्टर १९ अे, नेरुळ येथील नाल्याच्या बाजूला रस्त्यालगत संरक्षक कठडा बांधणे. (३१) प्र. क्र. ८०, सेक्टर १९ अे, नेरुळ येथील रायन इंटरनॅशनल स्कुल समोरील रस्त्याचे व गार्डनचे सुशोभीकरण करणे. (३२) प्र. क्र. ८०, सेक्टर १९ अे, नेरुळ येथील सर्व फुटपाथची दुरुस्ती करुन नुतनीकरण करणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव (प्र.),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक ३० जुलै २०१४.**